<u>भूसंपादन अधिनियम - २०१३</u>
**भूसंपादनाचा मोबदला आगाऊ स्वरूपात देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र:-संकिर्ण-०८/२०१५/प्र.क्र.१०३/अ-२**
मंत्रालय, मुंबई ४००० ३२
दिनांक - ३० मार्च, २०१६

<u>वाचा:-</u>१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग-एलक्युएन-३४७३/ह-१ दि.१६.१०.१९७३
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग- एलक्युएन-२७८३/(२८३३)/अ-२ दि.२०.४.१९८३

<u>**प्रस्तावना :-**</u>

भूसंपादन अधिनियम, १८९४ खाली संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीबाबत, भूसंपादन नियम पुस्तिकेतील नियम २६१ (क) " निवाड्याच्या घोषणेपूर्वी व प्रदानापूर्वी अधिनियमानुसार संपादनाखालील भूमींचा कब्जा घेण्यात आला असेल आणि तो खाजगी वाटाघाटीद्वारे घेण्यात आला असेल आणि अधिनियमाच्या कलम ४ खालील प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आली असेल आणि अशा प्रकरणांत निवाड्याने भरपाईची रक्कम दिली जाण्यास विलंब होण्याचा संभव असेल तर, संपादन अधिकाऱ्यास, जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीने, हितसंबंधित व्यक्तीस प्रत्येक प्रकरणांत अधिनियमाखाली भरपाई म्हणून दिली जाण्याची शक्यता असेल अशा रक्कमेच्या ८० टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही, इतकी आगाऊ रक्कम बिनव्याजी प्रदान करता येईल, असे नमूद करण्यात आले आहे."

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा राज्यात दि.१.१.२०१४ पासून लागू करण्यात आला असून भूसंपादनाची प्रक्रीया सदर कायद्यानुसार करण्यात येत आहे. नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन प्रक्रियेस लागणारा कालावधी लक्षात घेता भूधारकांना भूमि संपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना आगाऊ स्वरूपात देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यांस अनुसरून भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार संपादित होणाऱ्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना आगाऊ स्वरूपात देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

१) भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार कलम ११ ची अधिसूचना प्रसिध्द करत असताना, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन धारकांना स्वतंत्ररित्या लेखी स्वरूपात माहिती द्यावी की, त्यांना जर त्यांच्या संपादित होणाऱ्या जमिनीबाबत आगाऊ मोबदला हवा असेल, तर त्यांनी तसा लेखी अर्ज संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांकडे केल्यास त्यांच्या संपादित होणाऱ्या जमिनीच्या अंदाजे मोबदल्याच्या ५०% इतका मोबदला आगाऊ स्वरूपात देण्यात येईल. परंतु त्यासाठी भूधारकांनी लेखी स्वरूपात मागणी करणे आवश्यक असेल.

२) भूधारकांनी लेखी अर्जात आगाऊ रक्कमेसाठीचे नमूद कारण संयुक्तिक असणे अत्यंत गरजेचे आहे. अर्जातील नमूद कारण विचारात घेऊन, आगाऊ रक्कम देणेबाबतचा जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

३) आगाऊ मोबदला प्रदान करत असताना संबंधित भूमीच्या मालकी हक्काबाबत किंवा त्या जमिनीमधील हितसंबंधाबाबत कोणताही विवाद असू नये. Title clear असणे अत्यंत आवश्यक आहे किंवा विवादाची कोणतीही शक्यता असता कामा नये. जमिनीवरील मालकी हक्क स्पष्ट असावा. हितसंबंधित व्यक्तींनी भूमीच्या संबंधातील त्यांच्या हक्काच्या बाबतीत लेखी पुरावा सादर करणे आवश्यक असेल. मालकी हक्क निर्विवाद स्पष्ट होत असेल तरच आगाऊ मोबदला देण्यात यावा.

४) संबंधित जमीन भूसंपादन प्रक्रियेमधून वगळली जाणार नाही, याबाबत तसे प्रमाणपत्र संबंधित संपादक संस्थेने देणे बंधनकारक राहील.

५) आगाऊ रक्कम देण्यापूर्वी, अशी रक्कम मिळणारी प्रत्येक व्यक्ती, इतर कोणत्याही संबंधित पक्षाने पुढे भरपाईसाठी दावा सांगू नये यासाठी शासनास हा निरक्षण प्रदान करणारे व निवाड्यानुसार त्यानंतर देय होईल अशा भरपाईमध्ये आगाऊ रक्कमेचे समायोजन करण्यास व त्यास आगाऊ देण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेच्या बाबतीत भरपाईच्या शिलकीच्या प्रदानाच्या तारखेपर्यंत कोणत्याही व्याजाची मागणी न करण्यास इतर गोष्टींबरोबर संमती देणारे बंधपत्र विहित नमुन्यामध्ये करून देईल.

६) संपादित होणाऱ्या जमीनीबाबत भूसंपादन प्रक्रिया न्यायालयीन दावे व इतर कारणांमुळे रद्द झाल्यास, आगाऊ देण्यात आलेली रक्कम वसूल करण्यासाठी संबंधित भूधारकांकडून विहित नमुन्यात बंधपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाने घेणे बंधनकारक राहील.

७) वरिल क्र.६ प्रमाणे बंधपत्र देऊनही संबंधितांनी सदर रक्कम परत जमा न केल्यास, मोबदल्याची रक्कम महसूली थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी.

८) शासनाच्या विभागासाठी भूमी आवश्यक असेल तेथे, जिल्हाधिकाऱ्यांनी आगाऊ देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रक्कमेबाबत संबंधित विभागास कळविणे आवश्यक राहील.

९) संपादनाकर्त्या संस्थेस, भूसंपादनाच्या अनुषंगाने पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास व आगाऊ देय असलेल्या भरपाईच्या अंदाजित रकमेचा समावेश होईल, अशाप्रकारे धनादेश देण्याबाबत कळविण्यात यावे.

१०) आगाऊ रक्कम देण्याची बाब, भूसंपादन संस्थेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा केलेल्या रकमेच्या उपलब्धततेशी निगडित राहील.

११) संपादक संस्थेने खाजगीरित्या ताबा घेतलेल्या जमिनीबाबतचे संपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करतानाच, सदरहू जमीन संपादनातून मुक्त केली जाणार नाही. तरी या प्रकरणी आगाऊ मोबदला देण्यास हरकत नाही व त्याप्रमाणे आर्थिक तरतूद करण्यात आली आहे असे प्रमाणपत्रही सादर करावे.

सदर शासन निर्णय विधी व न्याय विभागाच्या अनौ. सं.क्र.४३९/१३३/Civil/Confl./२०१५/-A॰Br., दिनांक १९.११.२०१५ व वित्त विभागाच्या अनौ. सं.क्र.२६/२०१६/व्यय-९, दि.११.२.२०१६ अन्वये सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०१६०३३११२१६४३९३१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2016.03.31 12:16:46 +05'30'

**(सु.कि.गावडे)**
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

**प्रति,**

१) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे
६) सर्व उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) / उप विभागीय अधिकारी
७) कार्यासन अ-१, अ-३ व अ-४, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) निवडनस्ती (अ-२)